| MHKO050032132022 | दाखल दिनांक : २७/०७/२०२२<br>नोंदणी दिनांक : २७/०७/२०२२<br>निकाल दिनांक : १०/०३/२०२६<br>कालावधी : ०३ वर्षे ०७ महिने १४ दिवस |
|---|---|

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी इचलकरंजी जि. कोल्हापूर यांचे न्यायालयात**

**[पिठासिन अधिकारी - श्रीमती. एम.एस.गावडे]**

**म.सं.कौ.हिं.का.अर्ज-१०३/२०२२** **निशाणी क्र.३४**

**१) प्रतिक्षा बलराम कोरे**
व.व.२६, धंदा- काही नाही.
रा. द्वारा श्री. राजेंद्र शंकरराव नावलगी, ६७४,
जुनी जैन वस्ती जवळ, गांधी चौक, हुपरी
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर
**२) कु.श्लोक बलराम कोरे**
व.व.३, धंदा- काही नाही.
रा. वर नमूद पत्यावर.

**अर्जदार**

**वि.**

**१) बलराम मल्लाप्पा कोरे**
व.व.-३९, धंदा- नोकरी.
रा. मेन रोड मराठी शाळेजवळ, कडगांव
ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर.
**२) मल्लाप्पा सत्याप्पा कोरे**
व.व.- ६५, धंदा- सेवानिवृत्त.
रा. वर नमूद पत्यावर.

**वि.प.**

**३) लक्ष्मी मल्लाप्पा कोरे**

व.व.- ५५, धंदा- घरकाम.

रा. वर नमूद पत्यावर.

**४) संतोष मल्लाप्पा कोरे** **वि.प.**

व.व.- ४२, धंदा- नोकरी.

रा. वर नमूद पत्यावर.

**५) प्रकाश मल्लाप्पा कोरे**

व.व.- ३०, धंदा- सलून व्यवसाय.

रा. वर नमूद पत्यावर.

**अर्ज- कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२,१७,१८,१९,२० व २२ अन्वये.**

**उपस्थिती-**

| | |
|---|---|
| **अर्जदारातर्फे विधिज्ञ** | **ॲड. आर.बी. शेख** |
| **गैरअर्जदारा तर्फे विधिज्ञ** | **ॲड. व्ही. एम. पाटील** |

**न्यायनिर्णय**

**(दिनांक १०/०३/२०२६)**

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज हा कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२, १७, १८, १९, २०, २२ अन्वये दाखल केलेला आहे.

**०२. अर्जदाराचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे आहे;**

अर्जदार व वि.प.नं. १ चा विवाह मध्यस्थांमार्फत व सहमतीने हिंदू विवाह जातीतील रितीरिवाज व रुढी परंपरेप्रमाणे विधीयुक्त दि. ०७/०७/२०१६ इ.रोजी

वि.प.यांचे राहते घरी मेन रोड मराठी शाळेजवळ, कडगाव, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर येथे झालेला आहे. अर्जदार नं.१ व वि.प.नं. १ यांचे पती पत्नी असे कायदेशीर नाते असून ते आजही अस्तित्वात आहे. सदर विवाहाची नोंद विवाह नोंदणी कार्यालयात केलेली आहे. सदर विवाह बंधनातून कु. श्लोक, व.व. ४ हा मुलगा झालेला आहे. लग्न ठरवतेवेळी वि.प.व त्याचे घरचे लोकांनी वि.प.नं. १ हा एम.ए. व प्रिटींग पॅकिंग डिप्लोमा झालेला असून गेले पाच वर्षापासून नायजेरिया येथे नोकरीस असून दरमहा रक्कम रु.१,५०,०००/- इतका पगार आहे व त्याला कोणतेही व कसल्याही प्रकारचे व्यसन नसलेचे सांगितले होते. वि.प.व त्याच्या घरच्या लोकांनी त्यांना मुलगी पसंत असून वि.प. हे पंधरा दिवसाच्या सुट्टीसाठी आलेले आहेत. त्यामुळे आठ दिवसात लग्न झाले पाहिजे असे सांगितले. अर्जदार व त्यांचे घरच्या लोकांनी वि.प.व त्यांचे घरच्या लोकांच्या शब्दांवर विश्वास ठेवून सदर लग्नास होकार दिला.

**०३.** अर्जदार यांच्या घरचे लोकांनी लग्नानंतर मुलीचे काय असे विचारले असता वि.प.यांनी पासपोर्ट काढून घेवू पासपोर्ट मिळाले की मी लगेच तिला बरोबर घेवून जाणार असे सांगितले. त्यावेळी अर्जदाराच्या आई वडीलांनी आपण यादी पे शादी पध्दतीने लग्न लावून देवू असे सांगितले, पण वि.प.व त्याचे घरचे लोकांनी त्यास नकार देवून थाटामाटात लग्न झाले पाहिजे असे सांगितले. अर्जदाराच्या आईवडीलांची आर्थिक परिस्थिती बेताची असताना देखील अर्जदाराच्या वडीलांनी लोकांकडून हातउसने पैसे घेवून अर्जदारास पाच तोळे सोने संपुर्ण संसार सेट व लग्नाचा निम्मा खर्च असे एकूण रक्कम रुपये ५,००,०००/- खर्च केले. लग्नानंतर अर्जदार वि.प. यांचे घरी कडगांव येथे नांदणेस गेले. लग्नादिवशीच वि.प. यांनी दारु पिवून खूप दंगा केला. सदर गोष्टीचा अर्जदारास फारच मोठा मानसिक धक्का बसला. पण नवीनच लग्न झालेने अर्जदार वि.प. यांना काहीही न बोलता स्वतः मानसिक त्रास सहन करीत राहिले. लग्नानंतर सहा महिने वि.प. व त्यांच्या घरच्या लोकांनी अर्जदारास व्यवस्थित नांदवले.

त्यादरम्यान वि.प. हे नायजेरीयाला न जाता गावी राहिलेले होते. त्या दरम्यान अर्जदार वि.प.यांना त्यांच्या नोकरीबाबत विचारणा केली असता वि.प. यांनी दरवेळी उडवाउडवीची उत्तरे देवून वेळा काढून नेली.

**०४.** वि.प.हे दररोज दारु पिऊन अर्जदारा बरोबर वाद घालून भांडण करु लागले. अर्जदार ही वि.प.व त्यांचे घरचे लोकांचे म्हणण्याप्रमाणे व ते सांगतील त्याप्रमाणे रहात होते व अर्जदार सर्व जबाबदाऱ्या पार पाडत होती पण वि.प. हे अर्जदारा बरोबर विक्षिप्तपणे वागत होते. त्याबाबत अर्जदारांनी वि.प.चे आई वडीलांना विचारणा केली असता त्यांनी अर्जदारालाच दोषी ठरवून तुझ्या पायगुणामुळच आमच्या पोरग्याचं हे हाल झालं, तेची नोकरी गेली तुझ्या मुळे आमच्या पोराच्या आयुष्याची वाट लागली असे म्हणून अर्जदाराला अश्लिल भाषेत शिवीगाळ केली. अर्जदाराला सदर गोष्टी ऐकल्यानंतर खुपच मोठा मानसिक धक्का बसला.

**०५.** अर्जदाराने सदर गोष्टी त्यांच्या आई वडीलांना सांगितलेनंतर त्यांच्या आई वडीलांनी इतर नातेवाईकांकडे वि.प. बाबत अधिक चौकशी केली असता वि.प. हे नायजेरीया येथे नोकरीस होते परंतू तेथे दारु पिऊन दंगा केलेने लग्नापुर्वीच त्यांना नोकरीवरुन काढून टाकले असल्याचे अर्जदार व त्यांच्या आई वडीलांना समजले. वि.प. व त्यांचे घरचे लोकांनी त्यांची व त्यांच्या घरच्या लोकांची फसवणूक केल्याचे समजलेने अर्जदार व त्यांचे घरचे लोकांनी त्याबाबत वि.प. व त्यांचे घरचे लोकांकडे विचारणा केली असता त्यांनी अर्जदारांची फसवणूक केलेचे मान्य केले. अर्जदाराने झाले गेले ते विसरुन जाऊन माझे तुमचेवर प्रेम आहे आपण आपला संसार व वैवाहिक आयुष्यात सुखाने जगू व नव्याने सुरवात करु असे सांगून अर्जदाराचे आई वडीलांनाही अर्जदाराने वि.प. सोबत राहणार असलेचे सांगितले. मात्र वि.प.व त्यांचे घरचे लोकांनी राग मनात धरुन अर्जदारास जास्तच त्रास देणेस सुरुवात केली. वि.प.व त्यांचे भाऊ दररोज दारु पिऊन अर्जदारास अश्लिल शिवीगाळ करुन वाद घालून भांडण करु लागले. हातामध्ये येईल त्या वस्तू अर्जदारास फेकून मारत असत. वि.प.यांचे

गैरवागण्यास वि.प. चे घरचे लोकांची फूस होती व आहे. मुळातच अर्जदार शांत, सुस्वभावी व समंजस असलेने वि.प.व त्यांचे घरचे लोकांच्या वागण्याचा अर्जदारास खुपच मानसिक त्रास होत होता.

**०६.** वि.प. अर्जदारास खूपच त्रास देत असल्याने अर्जदार वि.प.चे गैरवागण्याबाबत अर्जदारांच्या आईवडीलांना फोन करुन सांगितले. त्यावेळी अर्जदाराचे आईवडील व नातेवाईक असे सर्वजण वि.प.चे घरी गेले असता वि.प.ने स्वतःच्या सर्व चूका मान्य करुन यापुढे कोणताही त्रास देणार नाही व मी नोकरी शोधतो असे सांगितले. तदनंतर वि.प. हा काही दिवस व्यवस्थित वागला. वि.प. यास सन २०१८ मध्ये श्री महालक्ष्मी कॅलेंडर कागल एम.आय.डी.सी. कागल येथे नोकरी लागली. वि.प. यांने नोकरीच्या ठिकाणी जावून येवून त्रास होत असलेने कागलमध्ये भाडयाने राहू असे सांगून अर्जदारास घेवून कागल येथे राहिले. त्यादरम्यान अर्जदार गरोदर राहिली. वि.प. याचे वागणेत बदल झाला असेल असे समजून अर्जदार त्यांचे परीने सर्व ती कामे व जबाबदाऱ्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत होते. पण त्याठिकाणीही वि.प. याने अर्जदाराला शिवीगाळी करुन दारु पिवून नाहक त्रास देणेस सुरुवात केली. वि.प. याने सतत अर्जदारांच्या चारित्र्यावर संशय घेवून तर कधी पैशाची मागणी करुन नाहक त्रास देणेस सुरुवात केली. अर्जदार गरोदर असताना वि.प.ने दारु पिऊन शिवीगाळी करुन अर्जदाराला घराबाहेर काढले. अर्जदाराने हात जोडून विनंती केली तरी अर्जदाराला घरामध्ये घेतले नाही. नाईलाजास्तव अर्जदाराचे आई वडील अर्जदाराला माहेरी हुपरी येथे घेवून आले.

**०७.** अर्जदाराच्या सोनोग्राफी, औषधोपचार हा सर्व खर्च अर्जदाराचे आई वडीलांनी केला. तदनंतर वि.प. अर्जदाराच्या आईवडीलांना मला एक संधी द्या मी पुन्हा असे वागणार नाही असे म्हणून मी तुमच्याजवळच राहतो, मी नोकरी करतो असे म्हणाला. अर्जदाराचे आईवडीलांचे पावसामूळे घर पडले होते. ते भाडयाचे घरात राहात होते व आहेत. वि.प. याचे शब्दावर विश्वास ठेवून व आपल्या मुलीचा संसार सुखाचा व्हावा या

हेतूने वि.प.यास ठेवून घेतले. वि.प.पहिले काही दिवस व्यवस्थित वागले तदनंतर जवळजवळ सहा महिने वि.प. हा काहीही कामधंदा करत नव्हता. अर्जदार व त्यांचे घरचे लोक वि.प. यास म्हणेल तसे व त्याप्रमाणे सर्व गोष्टी देत होतो.

**०८.** अर्जदार वारंवार वि.प. यास आपण माझ्या माहेरी किती दिवस राहणार तुम्ही गावी जावून रहा, डिलेव्हरी झाली की मी येते. तुम्ही नोकरी करा, होणाऱ्या बाळाचा तरी विचार करावा लागेल अशा प्रकारे खूप समजावले त्यावेळी वि.प. हे पुन्हा त्याच ठिकाणी नोकरीवर जावू लागले. वि.प.त्यांचे पगारातील एक ही रुपया अर्जदाराला अथवा अर्जदाराचे घरी घरखर्चासाठी म्हणून देत नव्हते. पण अर्जदार व त्यांचे घरचे लोकांनी त्याबाबत त्यांना काहीच विचारणा केली नाही. दि.०६/०१/२०१९ इ.रोजी मुलगा श्लोक झाला. अर्जदार व त्यांचे घरचे लोकांना आता तरी वि.प.मध्ये बदल होईल व तो व्यवस्थित वागेल अशी आशा होती पण वि.प. याने अर्जदार व तिच्या मुलाची कोणती आणि कसल्याही प्रकारची जबाबदारी न घेता पगारातून मिळणारे सर्व पैसे स्वतःच्या चैनी व व्यसनासाठी वापरत होते. अर्जदार व त्यांची आई दररोज सकाळी लवकर उठून वि.प. यास घरचा डब्बा करुन देत होते. पण बरेच वेळा तो तसाच परत येत असे त्याबाबत वि.प. यास विचारणा केली असता आज चायनिज खाल्ले तर कधी हॉटेलला जेवलो असे कारणे देवू लागले. तरीही अर्जदाराचे घरचे लोक त्याला काहीही बोलले नाहीत.

**०९.** वि.प. यांना अर्जदाराने बाळ तीन महिन्याचे झाले की आपण गावी जावूया अशा प्रकारे वारंवार समजावण्याचा प्रयत्न केला. पण वि.प.हे अर्जदाराला काही ना काही कारणे देवून गावी घेवून जाणेस अथवा भाडेतत्वावर राहणेस विरोध करीत होते. वि.प. याचे घरचे लोक अर्जदाराला फोन करुन वि.प.चा पगार संपवतेस आम्हाला पैसे पाहिजेत असे म्हणून अर्जदाराला व त्यांच्या घरच्या लोकांना शिवीगाळी करीत होते. वि.प.च्या आई आमचे घरी येवून त्यांना व त्यांच्या घरच्यांना शिवीगाळी करु लागल्या. अर्जदाराने वि.प. याचे गैरवागण्याबाबत सांगितले असता तुझा नवरा आहे ते आम्हाला

काय माहिती नाही तो इथं राहतोय नोकरी करतोय आम्हाला पैसे पाहिजे असे म्हणून वाद घालून भांडण करु लागल्या. अर्जदाराचे आई वडील आमच्या पोराचा पगार बसून खातात असे म्हणून नाहक नातेवाईकांमध्ये बदनामी करु लागले. त्यामुळे अर्जदाराने त्यांच्या मावशीकडून हातउसने पैसे घेवून दोन ते तीन वेळा वि.प.चे घरचे लोकांना दिले. मुलगा श्लोक तीन महिन्याचा झाल्यानंतर अर्जदाराचे आई वडीलांनी मुलाचे बारसे घातले त्यावेळी रितीरिवाजाप्रमाणे वि.प. यांचे घरचे लोकांना बोलावले त्यांचा योग्य तो मानपान केला पण तरीही अर्जदार व त्यांचे घरचे लोकांना शिवीगाळी करुन वाद घालून भांडण केले.

**१०.** वि.प.चे वागणेत बदल न होता दिवसेंदिवस दारु पिवून अर्जदाराला मारहाण करणेस सुरुवात केली. अर्जदाराच्या आई वडीलांनी विरोध केला असता त्यांनाही शिवीगाळी केली. बरेच वेळा वि.प. यांनी घराचे दरवाजे जोरात बडवणे तर रात्री अपरात्री दारु पिवून दंगा करुन उपद्रव करणेस सुरु केला. अर्जदार व त्यांच्या घरचे लोकांना नाहक घरमालक व शेजारचे लोकांचे बोलणे खावे लागले. वि.प. याचे गैरवागण्याबाबत त्यांचे आई वडील भाऊ यांना बोलावून सांगितले. पण त्यांनी त्याच्या गैरवागणेस दुजोरा दिला व निघून गेले. तदनंतर वि.प. हे दारु पिण्यासाठी लहान मुलगा श्लोक याला बारमध्ये घेवून गेले. सदर गोष्ट शेजारच्या लोकांनी अर्जदाराला व त्यांच्या घरचे लोकांना सांगितली. त्यावेळी अर्जदार वि.प. यास निदान मुलाला तरी घेवून जाऊ नका असे समजावून सांगत असता वि.प.ने अर्जदाराला, तु कोण मला सांगणार? माझा मुलगा आहे, असे म्हणून अश्लिल शिवीगाळी करुन मारहाण केली. अर्जदाराने त्यांच्या वैवाहिक जीवनाचा व मुलाच्या भावी आयुष्याचा विचार करुन वि.प. कडून होणारा सर्व त्रास सहन करीत वि.प. सोबत रहात होते. पण वि.प.चे वागणेत काहीच फरक पडला नाही. उलट वि.प.ने दोन दोन दिवस घरी येणे बंद केले घरी आलेच तर दारु पिवून घरामध्ये दंगा करणेस सुरुवात करत. अर्जदार काळजीपोटी काही सांगण्याचा प्रयत्न केल्यास अर्जदारालाच मारहाण करीत होते.

**११.** दि. २७/०२/२०२० इ. रोजी वि.प. अर्जदारांना काहीही न सांगता घरातून निघून गेले.वि.प. घरी आले नाहीत म्हणून अर्जदाराने फोन केला असता वि.प.ने मी माझ्या गावी आलो आहे. मला तुझ्या बरोबर रहायचे नाही मी तुला नांदवणार नाही असे म्हणून फोन ठेवला. वि.प.याने दोन वर्षाहून अधिक काळ कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय अर्जदार व मुलगा श्लोक याचा त्याग करुन स्वतः आपले गावी निघून गेले आहेत. त्यानंतर अर्जदार व त्यांचे घरचे लोकांनी वि.प. यांचेकडे अर्जदाराला व्यवस्थित नांदवून घ्यावे याकरीता वेळोवेळी प्रयत्न केले. पण वि.प.नी अर्जदाराला नांदवणेस पुर्णपणे नकार दिला आहे. वि.प. हे अर्जदाराला राहते घरामध्ये प्रवेश नाकारत आहेत. वि.प.नी अर्जदाराची व मुलाची पालनपोषणाची जबाबदारी ही नाकारलेली आहे. अर्जदाराचे आई वडील व मध्यस्थी नातेवाईकांच्या मदतीने तीन वेळा वि.प.व त्यांचे घरचे लोकांबरोबर समझोता मिटींग घेतली. पण वि.प.यांनी अर्जदाराची जबाबदारी घेणेस व अर्जदाराला नांदवणेस पुर्णपणे नकार दिला होता व आहे. वि.प.ने अर्जदाराकडे व मुलगा श्लोक कडे जाणुनबुजून दुर्लक्ष केले आहे. अर्जदाराचे पालनपोषणाची जबाबदारी नाकारली आहे. अर्जदार स्वतःचा व मुलगा श्लोक याचा उदरनिर्वाह व सांभाळ करणेस असमर्थ आहे. याउलट वि.प.हा उच्चशिक्षित असून त्याचे एम.ए.व प्रिटींग पॅकिंग डिप्लोमा झालेला आहे. वि.प. हे श्री महालक्ष्मी कॅलेंडर, कागल एम.आय.डी.सी. कागल याठिकाणी प्रिटींग विभागात कार्यरत असून त्यास दरमहा रु.२५,०००/- इतका पगार आहे.

**१२.** वि.प. याचे वडील एम.एस.आर.टी.सी. मधुन सेवानिवृत्त झाले असून त्यांना दरमहा रु. २०,०००/- इतके निवृत्ती वेतन मिळते. तसेच वि.प. यांची वडिलार्जित दिड एकर शेती असून त्यातून वार्षिक रक्कम रु.१,५०,०००/- व दुध व्यवसायातून दरमहा र.रु.६०००/-इतके उत्पन्न मिळते. वि.प. यांचेवर अर्जदार व मुलगा श्लोक याचेशिवाय अन्य कोणीही अवलंबून नाही. प्रस्तूत कामी वि.प. यांनी म्हणणे दिलेले आहे. ते म्हणणे साफ खोटे व लबाडीचे असून अर्जदार व मुलगा श्लोक यांना आर्थिक

सहाय्य देण्याचा आदेश व्हावा. अर्जदारांना घरखर्च, कपडे लत्ता, औषधोपचार खर्च, शिक्षण, फोन व इतर आवश्यक खर्च इ. करीता दरमहा र.रु.५०००/- व मुलगा श्लोक याला दरमहा रु.३,०००/- इतकी पोटगी देणेचा आदेश व्हावा अशी विनंती केली आहे.

**वि.प. यांचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे आहे;**

**१३.** वि.प. क्र.१ ने त्याचे म्हणणे नि.१४ वर दाखल केलेले आहे. यातील वि.प.चा विवाह अर्जदारसोबत दि.०७/०७/२०१६ इ. रोजी झालेला आहे. सदरचा विवाह कडगाव येथे चाली-रीतीरिवाजाप्रमाणे रूढीपरंपरेप्रमाणे झालेला आहे. सदरच्या विवाहाचा संपूर्ण खर्च यातील वि.प.नी व त्यांचे घरचे मंडळीनी केलेला आहे. तेव्हापासून अर्जदार ह्या वि.प.च्या कायदेशीर पत्नी झालेला आहेत.

**१४.** सदरचे लग्नानंतर अर्जदार ह्या यातील वि.प.च्याकडे कडगाव येथे नांदणेस आल्या. लग्नानंतर थोडे दिवसच अर्जदार ह्या व्यवस्थित नांदल्या. तदनंतर काही दिवसात अर्जदार ह्या यातील वि.प. सोबत विनाकारण भांडणे करू लागल्या, विनाकारण वारंवार माहेरी जावू लागल्या. अर्जदार ह्या तासन्तास घरच्यांसोबत फोनवर बोलत असत. यातील अर्जदार ह्या लहानसहान कारण देऊन वारंवार माहेरी का जात आहात याची माहिती घेतली असता, यातील अर्जदारांचे माहेरच्याकडील व्यक्तीशी संगनमत करून यातील वि.प. यांना घरजावई करण्याच्या उद्देशाने वि.प. यांना माहेरी घेऊन जात असत.

**१५.** वि.प. हुपरी येथे राहून एम.आय.डी.सी मध्ये महालक्ष्मी येथे तात्पुरत्या स्वरूपाची नोकरी करीत असताना येणारा सर्व पगार व बोनस अर्जदार काढून घेत असत. वि.प यांनी अर्जदार यांना वि.प. चे येणाऱ्या पगारामधून हुपरी येथे लाजरी ब्युटीपार्लर काढून दिलेले होते. सध्या यातील अर्जदार या तेच ब्युटीपार्लर चालवून आपला चारीतार्थ चालवीत आहेत व ऐशोआरामात जिवन व्यतित करीत आहेत. वि.प.हे अर्जदार यांचेकडून झालेला मानसिक त्रासाचा प्रकार विसरून अर्जदार

हिचेसोबत नांदणेस तयार होते व आहेत. परंतु, अर्जदार व त्याचे घरचे मंडळीनी अचानकपणे वि.प. यांचेशी भांडण करून त्यांना घरातुन २७/०२/२०२० इ. रोजी हाकलवून लावलेले आहे. वि.प. हे अर्जदार यांना वेळोवेळी विचारणा केली असता, अर्जदार व अर्जदारांचे वडिलांनी  वि.प.ना अपमानास्पद वागणूक देऊन पुन्हा पुन्हा तिथून हाकलून काढण्याची भाषा केली व तिथून हाकलून काढले. तसेच वि.प. यांचे विरुद्ध हुपरी पोलीस स्टेशनमध्ये खोट्या व बनावट स्वरूपाची तक्रार देणार आहे अशी धमकी दिली. तरीदेखील त्यानंतर वि.प.नी अर्जदारशी वारंवार संपर्क साधून नांदनेस येणेबाबत विचारणा केली, परंतु अर्जदार ह्या वि.प.ना मी तुमच्याकडे नांदायला काही केले तरी येणार नाही असे उडवाउडवीचे, उध्दट उत्तर देऊन नांदनेस येणेबाबत स्पष्ट नकार दर्शवला. अर्जदार ह्या वि.प.ना सोडून त्यांचा त्याग करून माहेरी निघून गेल्या आहेत. अर्जदारांच्या अशा वागण्यामुळे वि.प.ना खूप मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. तसेच वि.प.ना अत्यंत तणावात जीवन जगावे लागत आहे. वि.प.नं. १ ते ५ यांनी अर्जदार यांना कोणत्याही स्वरूपाचा त्रास दिलेला नव्हता अगर नाही. अर्जदार यांना आपला स्वतःचा गैरप्रकार झाकण्यासाठी वि.प.नं.१ ते ५ यांचेविरुद्ध खोट्या व बनावट स्वरूपाचा अर्ज विनाकरण दाखल केलेला आहे.

**१६.** प्रस्तुत अर्जाच्या निर्णयापर्यंत येण्याकरीता खालील मुद्दे विचारार्थ येतात. सदर मुद्यांवर सुसंगत कारणमिमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविण्यात आले आहेत :-

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| (१) | अर्जदार ही सिध्द करते काय की,  वि.प.नं.१ झालेल्या कौटुंबिक हिंसाचारास ती बळी पडली? | **अंशत: होकारार्थी** |
| (२) | अर्जदार ही वि.प.नं.१ यांचेकडून दरमहा रक्कम रू.८,०००/-  पोटगी म्हणून मिळण्यास पात्र आहे काय? | **होकारार्थी** |
| (३) | अर्जदार वि.पं. कडून झालेल्या मानसिक शारिरीक त्रास दिलेपोटी नुकसान भरपाई म्हणून रक्कम रू.५,००,०००/- (रूपये पाच लाख फक्त) मिळण्यास पात्र आहे का? | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| (४) | अंतीम आदेश? | **अर्ज अंशतः मंजूर.** |

**<u>कारणमिमांसा</u>**

अर्जदाराने तपासलेले साक्षीदार तसेच अभिलेखावर दाखल कागदपत्रे खालीलप्रमाणे;

| अ.नं. | साक्षीदार | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १ | प्रतिक्षा बलराम कोरे | २८ |
| **अ.नं.** | **कागदपत्रे** | **निशाणी क्र.** |
| १ | लग्नाची मुळ यादी | २९ |
| २ | विवाह प्रमाणपत्र | ३० |
| ३ | अर्जदाराचे मालमत्ता उत्पन्न व दायित्वाचे शपथपत्र | १७ |
| ४ | पुरावा बंद पुरशीस | ३१ |

**<u>मुद्दा क्र.०१ करिता-</u>**

**१७.** अर्जदाराने अर्जातील कथनांच्या शाबीतीकरिता स्वत:ला तपासले आहे. अर्जदाराचे सरतपासाचे शपथपत्र नि.२८ वर दाखल आहे. सरतपासाच्या शपथपत्रामध्ये अर्जदाराने अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केलेली आहे. अर्जदाराने अर्जातील कथनांच्या पुष्ठयर्थ दाखल केलेली कागदपत्रे नि.२९ व ३० वर दाखल आहेत. सदरची कागदपत्रे पाहता अर्जदार वि.प.नं.१ यांचा विवाह दि.०७/०७/२०१६ रोजी झाल्याचे दिसून येते. अर्जातील कथनांप्रमाणे अर्जदार नं.२ हा अर्जदार व वि.प.नं.१ यांचा मुलगा आहे. लग्नानंतर अर्जदार नं.१ व वि.प.नं.१ यांचे वैवाहीक जीवन सुरळीत चालू होते. त्यानंतर अर्जदाराच्या कथनाप्रमाणे वि.प.नं.१ दारू पिऊन शिवीगाळ व मारहाण करत होता.

अर्जदाराच्या वारंवार माहेरी जाण्यावरून व फोनवर माहेरी बोलण्यावरून भांडणे करत होता. शपथपत्रातील कथनांप्रमाणे वेळोवेळी वरिष्ठांच्या हस्तक्षेपाने अर्जदार व वि.प.नं.१ यांच्यातील भांडणे मिटली व त्यांचा संसार पुन्हा सुरळीत चालू झाला. परंतु, दि.२७/०२/२०२० रोजी वि.प.नं.१ अर्जदाराला काहिही न सांगता घरातून निघून गेले. त्यानंतर त्यांनी अर्जदार नं.१ किंवा २ यांची विचारपूस केली नाही किंवा त्यांच्या पालनपोषणाची जबाबदारी उचलली नाही. याउलट अर्जदाराने वि.प. नं.१ ला फोन केला असता वि.प.ने तिला तिच्यासोबत राहायचे नाही व तो तिला नांदवणार नाही असे म्हणून फोन ठेवला.

**१८.** वि.प.नं.१ ने नि.१४ वर आपले म्हणणे दाखल केलेले आहे. पुरेशी संधी देवूनही वि.प. ने अर्जदाराचा उलटतपास घेतला नाही. सबब, प्रकरण विना उलटतपास पुढे चालवण्यात आले.

**१९.** अर्जदाराची संपूर्ण कथने विचारात घेतली असता असे दिसून येते की, घरगुती हिंसाचाराचा आरोप पूर्णत: वि.प.नं.१ च्या विरोधात आहे. वि.प.नं.१ ने दारू पिऊन शिवीगाळ व मारहाण केल्याचे कथन अर्जदाराने केलेले आहे. तसेच दि. २७/०२/२०२० रोजी वि.प.नं.१ अर्जदारास न सांगता घरातून निघून गेला व त्यानंतर त्याने अर्जदार व त्यांच्या मुलाची कोणतीही पालनपोषणाची जबाबदारी पार पाडली नाही. वि.प.नं.१ ने त्याच्या म्हणण्यामध्ये असे कथन केले की, तो अर्जदार यांच्या घरी राहण्यास होता व त्याने अर्जदाराला नांदवण्याचे भरसक प्रयत्न केले. परंतु, अर्जदाराच्या हट्टी स्वभावामुळे प्रस्तुतचा खोटा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदाराने प्रस्तुत कामामध्ये तिचे सरतपासाचे शपथपत्र दाखल केलेले आहे.

**२०.** वि.प.नं.१ च्या कथनांमध्ये सत्यता असल्यास वि.प.नं.१ ने अर्जदाराचा उलटतपास घेणे आवश्यक होते. परंतु, पुरेशी संधी देवूनही वि.प.नं.१ न्यायालयासमोर गैरहजर होता व त्याने कोणताही उलटतपास घेतलेला नाही.

यापुढे आजतागायत उलटतपास घेणेकरिता कोणताही अर्ज किंवा स्वत: वि.प. नं.१ न्यायालयासमोर उपस्थित नाही. सबब, अर्जदाराची सरतपासाच्या शपथपत्रातील कथने बिनविरोध एकतर्फा शाबीत होतात.

**२१.** दारू पिऊन शिवीगाळ व मारहाण करणे, पालनपोषणाची कोणतीही जबाबदारी न घेणे, इ. बाबी कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम ३ अन्वये घरगुती हिंसाचाराच्या व्याख्येत येतात. प्रस्तुत प्रकरणामध्ये वि.प.नं.१ ने अर्जदाराच्या सरतपासातील कथनांचे खंडण केलेले नाही. सबब, सदरची कथने एकतर्फा शाबीत होतात. सबब, **मुद्दा क्र.१ चे उत्तर अंशत: होकारार्थी** नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करिता:-</u>**

**२२.** अर्जदाराने तिचे मालमत्ता, उत्पन्न व दायित्वाचे शपथपत्र नि.१७ ला दाखल केलेले आहे. सदरच्या शपथपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार तिच्या दैनंदिन उपजिवीकेकरिता वि.प.नं.१ वर अवलंबून आहे. ती कोठेही कामाला नाही. या उलट वि.प.नं.१ महालक्ष्मी कॅलेंडर, कागल एम.आय.डी.सी येथे नोकरीस असून दरमहा र.रू.२५,०००/- कमवतो. वि.प.नं.१ ने त्याचे मालमत्ता, उत्पन्न व दायित्वाचे शपथपत्र नि.१९ वर दाखल केलेले आहे. सदरच्या शपथपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वि.प. नं.१ हा एम.ए.पास असून अर्जदार नं.१ व अर्जदार नं.२ त्याची पत्नी व मुलगा आहे. सदरच्या शपथपत्रामध्ये वि.प. नं.१ ने त्याचा मासीक खर्च रू.६०००/- होत असल्याचे कथन केले आहे. परंतु, तो कोठे नोकरी करतो किंवा दरमहा किती कमवतो, त्याची स्वकष्टार्जीत किंवा वडिलोपार्जित मिळकत आहे किंवा कसे याबाबत नकारार्थी कथने केलेली आहेत. यावरून वि.प.नं.१ ने त्याच्या उत्पन्नाबाबत दिलेले शपथपत्र व त्यातील माहिती विश्वासहार्य वाटत नाही. वि.प. नं.१ त्याची अर्जदाराच्या प्रति असलेली जबाबदारी टाळत असल्याचे स्पष्ट होते.

**२३.** वि.प. नं.१ ने अर्जदार नं.१ व २ यांच्या पालनपोषणाची कोणतीही व्यवस्था केली नाही. अर्जदार नं.१ व २ अद्याप त्यांच्या दैनंदिन गरजांसाठी अर्जदाराच्या माहेरच्या लोकांवर अवलंबून आहेत. अर्जदार नं.१ या वि.प. नं.१ यांच्या पत्नी व अर्जदार नं.२ हा वि.प. नं.१ चा मुलगा असून त्यांचे पालनपोषण करणे हे वि.प. नं.१ चे कायदेशीर, सामाजिक तसेच नैतिक कर्तव्य आहे. हे कर्तव्य निभावण्यात वि.प. नं.१ ने विनाकारण कसूर करून एकप्रकारचा कौटुंबीक हिंसाचार अर्जदार नं.१ च्या विरोधात केलेला आहे.

**२४.** वि.प. नं.१ हा सज्ञान, सुशिक्षीत व स्वावलंबी असून स्वत:ची, अर्जदार नं.१ व २ यांच्या पालनपोषणाची संपूर्ण जबाबदारी पती व पिता म्हणून उचलण्यास समर्थ आहे. यापुढे वि.प.नं.१ ने दाखल केलेले उत्पन्न व दायित्वाच्या शपथपत्रातील मजकुरानुसार वि.प.नं.१ वर अन्य कोणाचीही जबाबदारी नाही. सबब, अर्जदाराच्या शपथपत्रातील कथनानुसार वि.प.नं.१ चे दरमहा उत्पन्न र.रू.२५,०००/- ग्राह्य धरल्यास, वि.प.नं.१ ने अर्जदारास मागणी केल्याप्रमाणे दरमहा र.रू.८०००/- उपजिवीका खर्च म्हणून देणे न्यायोचित वाटते. सबब, **मुद्दा क्र.२ चे उत्तर होकारार्थी** नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.०३ करिता-</u>**

**२५.** अर्जदाराने मानसिक व शारीरिक नुकसान भरपाईपोटी र.रू.५,००,०००/- (रूपये पाच लाख फक्त) ची मागणी केलेली आहे. परंतु झालेल्या मानसिक व शारीरिक त्रासासाठी वैद्यकीय उपचार घेतले किंवा कसे याबाबत तोंडी कथनांशिवाय कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल नाही. यापुढे नुकसान भरपाई म्हणून र.रू.५,००,०००/- (रूपये पाच लाख फक्त) कोणत्या आधारे ठरवले याबाबत देखील स्पष्टीकरण नाही. सबब, **मुद्दा क्र.३ चे उत्तर नकारार्थी** नोंदवित आहे व मुद्दा क्र.४ करिता आदेश खालीलप्रमाणे पारित करित आहे;

## आदेश

**०१.** अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

**०२.** वि.प.नं. १ ते ५ यांनी अर्जदार किंवा तिचे नातेवाईक यांच्यावर कोणत्याही प्रकारचा हिंसाचार करू नये असे आदेशित करण्यात येते.

**०३.** वि.प.नं१ ने अर्जदार नं.१ हीस रूपये ८०००/- (रूपये आठ हजार फक्त) दरमहा आर्थिक मदत, उपजिवीकेचा खर्च व अर्जदार नं.२ चा पालनपोषण खर्च म्हणून प्रस्तुतचा अर्ज दाखल तारखेपासुन दयावेत असे आदेशित करण्यात येते.

**०४.** सदर आदेशाची पुर्तता करण्याकामी आदेशाची छायांकित प्रत हे संरक्षण अधिकारी, हातकणंगले, जि.कोल्हापूर यांना देण्यात यावी.

**०५.** सदर न्यायनिर्णयाची नक्कल अर्जदार व वि.प. यांना मोफत देण्यात यावी.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)**

सही/-

दिनांक : १०/०३/२०२६.
ठिकाण : इचलकरंजी.

(एम.एस.गावडे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कोर्ट क्र.५,
इचलकरंजी.